# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

दिवाळी अंक : ऑक्टोबर-नोव्हेंबर २०११ ₹ ६०



स्वाभिमानी, आनंदी, परिपूर्ण जीवनाचा करू स्वीकार; बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवादाला देऊ नकार...

# अर्थपूर्ण

नोव्हेंबर २०१० रोजी
'अर्थपूर्ण'चा पहिला अंक आम्ही प्रसिद्ध
केला. नोव्हेंबर २०११ पासून 'अर्थपूर्ण'
दुसऱ्या वर्षात पदार्पण करेल. दिवाळी आणि
'अर्थपूर्ण'च्या नववर्षाचा सुवर्ण-योग जुळून
आला आहे. अल्पावधीतच 'अर्थपूर्ण'
महाराष्ट्रातील गावोगावी पोहचू लागला आहे.
हे यश मिळवून देणाऱ्या वाचक, वर्गणीदार,
'अर्थक्रांती' समर्थक, लेखक, विक्रेते, वितरक,
जाहिरातदार आणि 'अर्थपूर्ण'च्या निर्मिती
प्रक्रियेतील सर्वांचे आम्ही आभार मानतो.
अर्थपूर्ण टीमकडून दीपावलीच्या आपणा
सर्वांना आणि कुटुंबीयांना मनापासून

## शुभेच्छा!



# माणसाला माणसाची प्रतिष्ठा मिळवून दे प्रकाशा...!



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**दोन अमर्याद गोष्टी.. ज्याला सुरुवातही नाही आणि शेवटही नाही, काळ आणि अवकाश. या दोन्ही गोष्टींना माणसाने निर्माण केलेली दुनिया ना बांधून ठेवू शकत ना त्यांचा उलगडा करू शकत. संभ्रमात पडला आहे बिचारा.. प्रकाशा..त्याच्या एवढ्याशा आयुष्यातील त्या अमर्याद आसमंतांची गंमत त्याला चाखू दे...**

अंधाराचा कालखंड संपला, असे सांगत तू जसा प्रत्येकाच्या दारात प्रकट होतोस आणि 'मी सर्वांचा' अशी आरोळी ठोकतोस....तेव्हा आनंद, उत्साहाचे एक नवे युग सुरू होते...दररोज...तरीही त्या युगाला रोखण्याचे आणि त्याला साठविण्यासाठीचे तंत्रज्ञान शोधले जाते आहे ..दररोज... त्याच्या क्षणभंगुरत्वाची त्यांना जाणीव करून दे प्रकाशा...

सृष्टीच्या पालकत्वाची मानाची जबाबदारी निर्मात्याने सोपविलेल्या माणसाने सतयुगाला नाकारण्याचा प्रयत्न करून आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. आनंद, समाधानाचे तुकडे तुकडे पाडण्याची बुद्धी हा नियतीचा कट तर नव्हे? हे त्याला स्वच्छपणे सांगून टाक... तो नादान आहे...त्याने त्याच्या डोळ्यावर घातलेला काळाकुट्ट गॉगल हिसकावून घे... आणि तुझ्या सान्निध्यातील त्याची श्रीमंती आणि भूतलावर पसरलेले त्याचे साम्राज्य त्याला उघड्या डोळ्यांनी आणि मुक्त मनाने पाहू दे...

या सृष्टीत वनस्पतींना शरीर आहे, मात्र मन आणि बुद्धी नाही. प्राण्यांना शरीर आणि मन आहे, मात्र बुद्धी नाही, तर माणसाला मात्र शरीर आणि मनासोबत बुद्धीही आहे, असे म्हणतात. हे खरे असेल तर... हे प्रकाशा... सृष्टीने दिलेल्या या वरदानाची माणसाला दररोज चटका देऊन आठवण करून दे.

दोन अमर्याद गोष्टी.. ज्याला सुरुवातही नाही आणि शेवटही नाही, काळ आणि अवकाश. या दोन्ही गोष्टींना माणसाने निर्माण केलेली दुनिया ना बांधून ठेवू शकत ना त्यांचा उलगडा करू शकत. संभ्रमात पडला आहे बिचारा.. प्रकाशा..त्याच्या एवढ्याशा आयुष्यातील त्या अमर्याद आसमंतांची गंमत त्याला चाखू दे...

मुळातले बदल हे विज्ञानातले, तंत्रातले आणि यंत्रातले बदल आहेत, म्हणून माणसे बदलतात... अरे हो...हो... हे सर्व मान्यच आहे... पण बदलाचा हा झपाटा आज बेकाबू वाटत असला तरी माणूस तोच आहे. बघ.. त्याचे सर्व अवयव जेथल्या तेथे आहेत आणि यश, आनंद, प्रेम आणि समाधान या कल्पनाही त्याला आठवते तेव्हापासून त्याच आहेत. हे प्रकाशा या 'युनिक' गोष्टींचे भान माणसाला पुन्हा एकदा दे.

आशा-निराशा, यश-अपयश, मान-अपमान, स्तुति-निंदा, सुख-दुःख ही द्वंद्व जीवनात पदोपदी येतात, मात्र वेडा त्यालाच आयुष्य समजून बसला आहे. तू जसा प्रत्येक दिवसाकडे निरपेक्षतेने पाहून आपले काम चोख बजावतोस.. तशी प्रत्येक पायरी आत्मविकासासाठी आहे, असे म्हणून ते जगण्याची संधी आधुनिक जगाच्या धावण्याच्या शर्यतीमध्ये प्रत्येकाला मिळू दे...

प्रेमाची नाती तयारच होतात भरभरून प्रेमासाठी.. त्यांना जपून ठेवणे ही फार मोठी गोष्ट आहे. माणसाच्या जागी माणूस एखाद्या निर्जीव वस्तूसारखा उभा करता येत नाही, हे माणसामाणसातील




जैवसंबंधांचे मूल्य अमोल आहे, त्याची जागा यंत्र आणि मानवनिर्मित कवड्या घेऊ शकत नाहीत... प्रकाशा, तू जसा लख्ख येतोस तसे दचकायला झाले तरी चालेल.. पण.. हे समजावून सांग सगळ्यांना....

गर्दीत जागा शोधणारा अपंग, रस्ता ओलांडताना पडलेला अंध, कामच मिळाले नाही म्हणून उपाशीपोटी झोपणारा मजूर, कवड्यांची रोजमेळ होत नाही म्हणून शाळेत जाऊच न शकलेले भाऊबहिणी, वेदनांनी कळवळत पडलेला रुग्ण आणि निर्मितीतला आपला वाटा उचलून अपमानाला नाकारून 'शहीद' होणारा शेतकरी... यांची आणि अशा कोट्यवधी माणसांची...त्यांना त्यांचे जग न दिल्याबद्दल क्षमा मागण्यासाठीचे मोठे मन आम्हा सर्वांना दे प्रकाशा...

काही जण हुशार, काही अतिहुशार.. काही तर अति अति हुशार... त्या सर्वांना ही हुशारी केवळ आकडेमोडीसाठी नाही, याची जाणीव करून दे आणि त्यांना सांग की जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाच्या अंगी एक तरी उपजत देणगी दिलीच आहे...त्या निर्माणकर्त्याने.. ती शोधून काढणारे मानवी यंत्र दुर्मीळ योजक म्हणून शोधून काढण्याचा पुरुषार्थ त्याचा कान पकडून त्याला करायला सांग...

भूतकाळ आणि भविष्यकाळ विसरा आणि वर्तमानात जगा.. उपदेश चांगला आहे... मात्र ज्यांना या तीनही काळांनी नाकारले आहे... त्यांनाही जगण्याची संधी देणे हा मानवी संस्कृतीचाच भाग आहे, हे कळणारे समूह वाढतील, असे 'सॉफ्टवेअर' बायनरी सिस्टीममध्ये निर्माण करता येणार नाही कदाचित, मात्र प्रत्येकाच्या मनाच्या आतल्या कोपऱ्यात दडून बसलेले ते 'सॉफ्टवेअर' वापरण्याची एक लाट येऊ दे...

आपल्या पुढील पिढ्यांवर प्रेम करायचे म्हणजे रस्त्यावर झाड वाढवायचे. भविष्यात आपलेच पिल्लू दमूनभागून सावलीचा शोध घेत असेल तेव्हा असेच एक कोणीतरी वाढविलेले झाडच त्याला सावली देईल, कारण त्या वेळी तू आसंमतात असशील कोठेतरी! हे प्रकाशा, त्या वेळी आम्ही नसूच कदाचित... तूच असशील त्याचा मायबाप, या निसर्गचक्राचे भान आम्हाला दे...

स्वतंत्र व्हावे लागते ते मनाने.. जे मन स्वतंत्र आहे, त्याला कुठल्या बेड्या जखडू शकतात? पण या स्वतंत्र म्हणविल्या जाणाऱ्या भूमीवर मन खरेदी-विक्रीचा बाजार भरला आहे. या बाजारात उभे राहण्यापासून स्वतःला आवरण्याचे बळ आम्हाला दे. हे प्रकाशा.. हे बाजारच मुळातून उठविण्यासाठी करता येणार नाही का काही? अधिक उशीर होण्याआधीच आमची ऊर्जा-प्रतिभा त्याकारणी लागू दे..

शरीरातला आणि मनातला रोग शत्रूपेक्षाही भयंकर असतो, म्हणतात. तो निर्माण कसा झाला, अविश्वास, असुरक्षिततेचे वारे का वाहताहेत दाही दिशांनी... हे सांगत बसण्यापेक्षा आता निरामय आयुष्याची वाट दाखव बाबा...

तू खेळ सुरू केलास म्हणूनच मुले खेळायला आली आहेत बागेत.. त्यांना कळत नाही ते काय करताहेत.. तोडफोड... हल्लागुल्ला .. स्वार्थ... आणि सगळं सगळं मान्य आहे तुझं. खुळी आहेत बिचारी... चूक झाली... माफ कर बाबा...

**पण माणसाला माणसाची प्रतिष्ठा मिळवून दे प्रकाशा...!**